8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर 'आयटीआयच्या' हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

# प्रत्येकांनी आपत्ती व्यवस्थापन आणि बचावाचे धडे घ्यावेत - कौशल्य विकास मंत्री लोढा

## आयटीआय मध्ये नव्या सहा अभ्यासक्रमाचीही केली घोषणा

**मुंबई -** जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाम इथे दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवर सध्या तणावाचे वातावरण आहे. पार्श्वभूमीवर कौशल्य विभाग आणि अनिरुद्धाज अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईन द्वारे आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत.

या कार्यक्रमात कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे श्री. लोढा म्हणाले. त्याचबरोबर या कार्यक्रमात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आयटी आयमध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची यावेळी घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), ई व्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा यात समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

दोन दिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अ‍ॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक श्री. प्रवीण दीक्षित यांनी राज्यातील



आयटीआय विद्यार्थ्यांची नागरी संरक्षण या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा घेतली.

राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना नेमकी काय हे विद्यार्थ्यांना सांगितले. या दोन दिवसीय शिबिरात बचाव आणि मदतकार्य याचे प्रशिक्षण ही देण्यात येणार आहे. मानव निर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून त्या काळात घ्यायची काळजी, उपचार आणि बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थिनींनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य श्रीमती. एस. एस. माने यांनी यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# पाकिस्तानचा ड्रोन हल्ला; भारताचाही प्रतिहल्ला!

**नवी दिल्ली -** ऑपरेशन सिंदूरमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने आगळीक केली असून त्याने भारतावर ड्रोन हल्ले केले. जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर या ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आलं असून भारताची डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आहे. भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोन पाडल्याची माहिती समोर आली आहे. जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होते अशी माहिती समोर येत आहे. गुरुवारी रात्रीच्या वेळी भारताच्या हद्दीतील जम्मू शहरात पाकिस्तानच्या ड्रोनचा हल्ला केल्याचे तेथील स्थानिकांनी सांगितले पान २ वर

## सुरक्षेच्या कारणास्तव आयपीएलचा सामना रद्द

**धरमशाला -** येथील मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील सामनाया यापूर्वीच हलवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण गुरुवारचा सामना मात्र सुरु करण्यात आला होता. या सामन्याची १०.१ षटके झाली आणि सामना थांबवण्यात आला. सुरुवातीला मैदानातील एक फ्लड लाइट बंद झाली होती. त्यानंतर मैदानातील दुसरी फ्लड लाइटही रद्द करण्यात आली. त्यानंतर मैदानातील प्रेक्षकांना घरी जाण्यास सांगण्यात आले होते.

प्रेक्षक घरी निघाले आणि काही वेळाने आयपीएलच्या प्रशासनाने त्यानंतर हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सुरक्षेच्या कारणास्तव घेण्यात आला होता. कारण थोड्यावेळापूर्वी पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरमध्ये हल्ला केला. हा हल्ला भारताच्या सैन्याने परतवून लावला होता. त्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये ब्लॅक आऊट करण्यात आले. त्यानंतर अन्य राज्यांमध्येही ब्लॅक आऊट करण्यात येणार असल्याचे समोर आले. त्यानंतर सुरक्ष्च्या कारणास्तव हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे आता हा सामना पुन्हा खेळवण्यात येणार नाही.

युवा आदर्श

**ऑफर खुली ...**

आमच्या पक्षा यावे
दिली ऑफर खुली
चेष्टा केली म्हणता
हळूच मारली फुली
दर वेळी आशावाद
खुर्ची ठेवली खाली
पक्षात प्रवेश कराल
पुलाव करे खयाली
तिकडे नाही सन्मान
कुणी न तुम्हा वाली
इथे याल तर करतो
अर्धे राज्यही हवाली
शर संधान तुम्हावरी
कुठेही रंगूदे कवाली
होणारं पक्ष परिवर्तन
तयारी कितीदा केली
हाक ऐके बछड्याची
गाय परत का गं गेली
पुन्हा पुन्हा त्या झाडा
लपेटून बसल्या वेली
इकडे यायची इच्छा
कधी मुळी न लपली
दोन्ही बाजूला सारखी
सारी माणसे आपली

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# परतूर आगाराला एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांची भेट

**परतूर । प्रतिनिधी -** राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियानाअंतर्गत अधिकाऱ्यांनी भेट देऊन स्वच्छतेची पाहणी केली.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, परिवहनमंत्री तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परिवहन म




हामंडळ मुंबई यांच्या निर्देशानुसार राप. मंडळाच्या बसस्थानक व परिसरात स्वच्छतेच्या अनुषंगाने सन २०२५ मध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यात येत आहे.त्या अनुषंगाने परभणी येथील राज्य परिवहन विभागाचे अधिकारी हर्षलकुमार बाविस्कर तसेच विभागीय वाहतूक अधिक्षक हनुमंत चपटे यांनी भेट देऊन बसस्थानकाची स्वच्छतेबाबत पाहणी केली. यावेळी आगारप्रमुख माधुरी देशमुख, वाहतूक निरीक्षक सुरेखा साळवे,किशोर कचार, वरिष्ठ लिपिक मधुकर गोडबोले आदींची उपस्थिती होती.

# पुरस्कार प्राप्त पत्रकार बालाजी ढोबळे व भाऊसाहेब मुके यांचा सत्कार



परतूर । प्रतिनिधी - छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ सेवा समुहाच्या वतीने परतूर येथील पत्रकार बालाजी ढोबळे यांना '' मराठवाडा भूषण समर्थ गौरव '' हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला तसेच पत्रकार भाऊसाहेब पाटील मुके यांना आयकॉन ऑफ मराठवाडा'' सन्मान मिळाल्या बद्दल पतंजली आयुर्वेद मित्रमंडळाच्या वतीने दोघांचा सत्कार करून त्यांना भावी पत्रकारितेकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

शहरातील जेष्ठ पत्रकार बालाजी ढोबळे यांना वर्तमानपत्राच्या माध्यमातून सातत्याने प्रेरणादायी व लोकोपयोगी तसेच सकारात्मक वृत्तलेखन पान २ वर

# मोकाट कुत्र्यांचे मनपा प्रशासनाला चॅलेंज?

## शहर मनपा कार्यालय तसेच तहसिल कार्यालयात कुत्र्यांचा वावर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. कुत्र्याने चावा घेतल्यामुळे एका चिमुकलीचा मृत्यू झाला. गेल्या वर्षभरापासून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी विविध सामाजिक- राजकीय पक्षातील पदाधिकाऱ्यांकडून होत होती. मात्र याकडे वेळीच मनपा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिले नाही. आता मनपाकडून मोकाट कुत्र्यांची धरपकड सुरु झाली आहे. गुरुवार (दि ८) मनपा प्रशासनाने काही ठिकाणाहून कुत्री पकडून गाडीत टाकली आहे. तर दुसरीकडे मोकाट कुत्रं थेट मनपा कार्यालयात पोहचले. त्यामुळे काही काळ मोकाट कुत्रे हे मनपा प्रशासनाला एकप्रकारे चॅलेंज तर करत नाही ना? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मनपा नंतर तहसिल कार्यालयातही मोकाट कुत्र्यांचा वावर दिसून आला. त्यामुळे मनपा प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

जालना शहर महानगर पालिकेचे अधिकारी मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची भाषा करीत असले तरी त्यावर ठोस पाऊले पान २ वर






मनपा प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात येत असल्याचे पहिल्या छायाचित्रात दिसत असून दुसऱ्या छायाचित्रात थेट मनपा कार्यालयात मोकाट कुत्रे वावरतांना दिसून येत आहे.

# संपादकीय

## आधुनिक भगीरथ

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्यामनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची पुण्यतिथी. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### शंखनाद महोत्सव १ हजार वर्षांपूर्वीच्या सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे होणार दुर्मिळ दर्शन!

# २३ देशांतील लोकसहभाग; शंखनाद महोत्सव हा आध्यात्मिक पर्यटनाचा नवा अध्याय! - सनातन संस्था

**पणजी (गोवा) । प्रतिनिधी** - १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणारा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ धार्मिक नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील आध्यात्मिक जागृतीचा महोत्सव ठरणार आहे. २३ देशांतील प्रतिष्ठित मान्यवर, विविध संप्रदायांचे संत-महंत, मंदिरांचे विश्वस्त आणि २५ हजारांहून अधिक साधक, भाविक यांचा सहभाग अन् यज्ञयागामुळे हा महोत्सव काशी, उज्जैन, अयोध्येप्रमाणे आध्यात्मिक पर्यटनाचा नवा अध्याय असणार आहे, त्यामुळे विकासालाही गती मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस यांनी आज पणजी येथील पत्रकार परिषदेत दिली.

पणजी येथील 'हॉटेल मनोशांती'मध्ये आयोजित पत्रकार परिषदेला आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री. संतोष घोडगे, सांस्कृतिक न्यासाचे श्री. जयंत मिरिंगकर, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे श्री. नितीन फळदेसाई, कुंडई तपोभूमी येथील पद्मनाभ संप्रदायाचे श्री. सुजन नाईक, ब्राह्मण महासंघाचे श्री. राज शर्मा, जगद्गुरु स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचे अनुयायी श्री. अनिल नाईक, गोमंतक मंदिर महासंघाचे श्री. जयेश थळी आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. युवराज गावकर उपस्थित होते.

'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त १ हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ जोतिर्लिंगाचे दर्शन घेण्याची दुर्मिळ संधी सर्वांना मिळणार आहे. हे शिवलिंग मूर्तीभंजक गझनी याने तोडले होते आणि नंतर त्याचा पुढे अग्निहोत्र संप्रदायाच्या साधकांनी सांभाळ केला. आता 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या आशीर्वादाने आता हे शिवलिंग महोत्सवाच्या ठिकाणी १७ ते १९ मे या कालावधीत लोकांच्या दर्शनासाठी ठेवले जाणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळतील शस्त्रात्रांचे प्रदर्शनही लावण्यात येणार आहे.

काशी विश्वनाथ कॉरिडॉर आणि अयोध्येतील श्रीराम मंदिरामुळे उत्तर प्रदेशला दरवर्षी सुमारे २२ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे पर्यटन क्षेत्रात ७ व्या क्रमांकावर असलेले उत्तर प्रदेश आता अग्रस्थानावर पोहोचले आहे. यावरून केवळ आध्यात्मिक पर्यटनामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा चालना कसा मिळू शकतो, हे स्पष्ट होते. पूर्वी 'दक्षिण काशी' म्हणून ओळखल्या जाणार्या गोव्यालाही असा लाभ निश्चितच मिळू शकतो.




मंदिरे किंवा धार्मिक कार्यांना अंधश्रद्धा समजणार्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, मंदिरे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचा आत्मा आणि कणा आहेत. आज जागतिक स्तरावरील औद्योगिक शहरे लयाला जात असताना, उज्जैन, तिरुपती, रामेश्वरम्, काशी यांसारखी तीर्थक्षेत्रे असलेली शहरे हजारो वर्षांपासून टिकून आहेत, तसाच त्यांच्या परिसराचाही विकास झाला आहे.

शंखनाद महोत्सवामुळे पर्यटनात वाढ : या तीन दिवसीय महोत्सवासाठी देशविदेशातून २५ हजारांहून अधिक भाविक, साधक, प्रतिष्ठित लोक गोव्यात दाखल होणार आहेत. हे सर्वजण येथे ३ ते ५ दिवस निवास करतील, प्रवास करतील, स्थानिक वाहने वापरतील, मंदिरांना भेट देतील, हॉटेल, बाजार, रेस्टॉरंट्स, पर्यटन स्थळे यांचा लाभ घेतील. यामुळे सर्व स्थानिक व्यवसाय आणि रोजगार यांना चालना मिळेल. या सर्व प्रक्रियेतून जो जीएसटी, तसेच सेवा कर भरला जाईल त्यामधून राज्य सरकारलाही मोठे उत्पन्न मिळणार आहे.

हा महोत्सव उज्ज्वल अध्यात्मिक भविष्यासाठीचा शंखनाद : अन्य व्यवसायाच्या तुलनेत आध्यात्मिक पर्यटन हे एक सुरक्षित आणि शाश्वत विकासासोबतच समाजातील नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करणारे आहे. या महोत्सवामार्फत मंदिर परंपरा, लोककला, सांस्कृतिक ओळख, तसेच साधना, आध्यात्मिक विचारधारा आणि राष्ट्रनिष्ठ मूल्यांचा जागर करण्यात येणार आहे. एकूणच 'शंखनाद महोत्सव' हा उज्ज्वल आध्यात्मिक भविष्यासाठीचा शंखनाद आहे.

या महोत्सवाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळाला भेट द्या !

# महाराणा प्रताप ना कभी हारे; ना अकबर कभी जीता!

मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला.मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता.त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानल्या जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे.कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे.त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह.मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली. अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली.राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले. दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीरला प्राप्त झाले.तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला. अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला. वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता. राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील.परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

पान १ वरुन

## पाकिस्तानचा ड्रोन ...

आहे. त्यानंतर जम्मूमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आलं. त्यानंतर या प्रदेशाचा ताबा लष्कराने घेतला. दरम्यान, भारताची डिफेन्स सिस्टिम एस ४०० सक्रिय झाली आणि त्या माध्यमातून भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोनला हवेतच लक्ष्य केलं.

पाकिस्तानने ड्रोनने हल्ला करण्याचा प्रयत्न केलेल्या ठिकाणी जम्मू विमानतळ, जम्मू रेल्वे स्टेशन, चन्नी हिम्मत आणि जम्मूला लागून असलेला सीमावर्ती भाग आरएस पुरा यांचा समावेश आहे. भारताच्या हवाई संरक्षण प्रणाली ड-४०० ने पाकिस्तानच्या या हल्ल्याच्या प्रयत्नांना हाणून पाडले.

पाकिस्तानच्या दहशतवादाला भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं आणि नऊ ठिकाणी हल्ला करून दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. त्यानंतर गुरुवारी सकाळी पाकिस्तानने शस्त्रसंधीचं उल्लंघन करुन सीमाभागात गोळीबार केला.

पाकिस्तानच्या या हल्ल्याला प्रत्युत्तर देत भारताने लाहोरमध्ये ड्रोन घुसवून त्यांची एअर डिफेन्स सिस्टिम निकामी केली. त्यामुळे पाकिस्तानची जगभरात नाचक्की झाली. परिणामी पाकिस्तानमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं. तरीही पाकिस्तानने आता पुन्हा आगळीक केली आणि जम्मूवर ड्रोन हल्ला केला.

पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारताची एस ४०० ही डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली असून त्याने पाकिस्तानचे अनेक ड्रोन हवेतच नष्ट केले. जम्मूमध्ये नेमके किती ड्रोन आले याची नेमकी माहिती समोर आली नाही. पण भारताकडून ते सर्व ड्रोन पाडण्याची कारवाई सुरू आहे.

जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं अशी माहिती समोर आली आहे. जम्मूच्या विमानतळाच्या दिशेने जवळपास आठ ड्रोन येत होते. पण ते सर्वच ड्रोन हवेतच पाडण्यास भारताला यस आलं आहे.

जम्मूनंतर राजस्थानच्या सीमावर्ती भागातही ब्लॅकआऊट करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व सीमावर्ती भागात भारतीय लष्कर सक्रिय झालं आहे. पाकिस्तानच्या आगळीकतेला भारताने आता प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली असून पाकिस्तानवर हल्ला सुरू केला आहे. पाकिस्तानच्या भागात त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे.

भारताने पाकिस्तानची दोन JF १७ विमाने पाडली असून तशी कबुली पाकिस्तानच्या लष्कराने दिली आहे. पाकिस्तानचा संवादाच्या माध्यमावर विश्वास असून आम्हाला शांती हवी आहे अशी मुक्ताफळेही त्यांनी उधळली. पाकिस्तानचे हे विमान राजस्थानमध्ये पाडण्यात आलं असून त्याचे अवशेष लष्कराच्या हाती लागली आहेत. भारताशी कुरापत करण्याच्या प्रयत्नामुळे पाकिस्तानने दोन विमाने गमावली. गऋ १७ विमाने ही चीनने पाकिस्तानला दिली होती.

पाकिस्तानने भारताच्या दिशेने पाठवलेले ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले. आकाशातून जमिनीच्या दिशेने येणारे लाल रंगाचे गोळे हे तिथपर्यंत पोहोचू शकले नाहीत. भारताची एअर डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाल्यानंतर सर्व डोन हे हवेतच पाडण्यात आले.

## पुरस्कार प्राप्त ...

केल्याने छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ सेवा समुहाच्या वतीने ''मराठवाडा भूषण समर्थ गौरव'' पुरस्कार देण्यात आला. तसेच भाऊसाहेब पाटील मुके यांनी परतूर येथील शिक्षण विभागातील आयकर अपहार प्रकरण हे निर्भीड, निष्पक्ष व कोणत्याही अमिषाला बळी न पडता सतत १३ भाग वृत्त लेखन केल्याने सदरील प्रकारातील दोषींवर कारवाई झाली. याबद्दल नवभारत व नवराष्ट्र ने त्यांचा आयकॉन ऑफ मराठवाडा'' सन्मान देऊन सन्मानित केले. याबद्दल पतंजली आयुर्वेद मित्रमंडळाच्या माजी प्राचार्य भगवानराव दिरंगे व डॉ. दीपक दिरंगे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी पत्रकार सर्वश्री राजकुमार भारूका, अजय देसाई, माणिक जैस्वाल, प्रा. शरद बोराडे व वाजेद सय्यद आदी उपस्थित होते.

## मोकाट कुत्र्यांचे ...

अद्याप पर्यंत उचललेली दिसून येत नाहीत. काही ठिकाणांहून कुत्री पकडून गाडीत टाकण्यात येत आहे. मात्र, शहरातील विविध भागात असलेल्या मोकाट कुत्र्यांची संख्या पाहता मनपा प्रशासनला मोठ्या प्रमाणात काम करण्याची आवश्यकता आहे. शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शहरभरात होत आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनीही शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी टेंडर काढलेले आहे. कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आता मनपा प्रशासनाने कंबर कसली असली तरी थेट मनपा कार्यालय गाठत मोकाट कुत्र्यांनी मनपा प्रशासनाला चॅलेंज केले की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकीकडे कुत्री गाडीत पकडून टाकल्या जात असतांना मनपा मोकाट कुत्री घुसल्याने त्यांनी एकप्रकारे मनपाला धमकावण्याचा प्रयत्न तर केला नसेल?

# भारत आरोग्य संघटनेने दिला आयुष मंत्र्यांना यांना प्रस्ताव

**बदनापूर । प्रतिनिधी** - आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना भारत आरोग्य संघटनांच्या वतीने आव्हानात्मक विषयांचे समाधान स्वरूपात असणारा प्रस्ताव सादर केला आहे. यात संघ लोक सेवा आयोग (युपीएससी)मध्ये आयुर्वेद, आयुष्मान भारत आयुर्वेद,आरोग्य विमामध्ये आयुर्वेदाचा विस्तृत समावेश करणे अशा काही आव्हानात्मक विषयांचे समाधान स्वरूपात असणारा प्रस्ताव आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांना भारत आरोग्य संघटनाचे अध्यक्ष डॉ. अरुण खैरे, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ. केतन दांगट,



सचिव डॉ. अनुप थूटे आणि अन्य पदाधिकार्यांनी आज प्रस्तुत केला. आयुष मंत्री जाधव यांच्याद्वारे सकारात्मक चर्चा होऊन अतिशय उत्तम असा प्रतिसाद प्राप्त झाला.

# बुलडाणा अर्बनच्या स्थानिक संचालक पदी निशा जैस्वाल यांची निवड

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - येथील स्थानिक संचालक पदी नुकतीच निशा संजय जैस्वाल यांची निवड झाली. त्यांचे पती या संस्थेत संचालक म्हणून होते त्यांच्या जागी त्यांची संस्थेने नुकतीच निवड करून त्यांचे सत्कार करून अभिनंदन केले. या वेळी या कार्यक्रमासाठी विभागीय व्यवस्थापक श्री नितीन परदेशी यांनी त्यांचा नावाची घोषणा केली. त्यांचे या वेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक देवीदास देशमुख यांनी निशा जैस्वाल यांचे स्वागत केले. या वेळी संस्थेचे संचालक अलकेश सोमाणी,डॉ अविनाश सुरुशे, प्रदीप काबरा, डॉ प्रशांत काबरा,गजानन उगले,यांच्या सह शाखा अधिकारी पंढरीनाथ मिसाळ आणि संस्थेचे स्टाप उपस्थित होता.

# अस्मिताच्या सुवर्ण महोत्सवाला सुरुवात

**मुंबई -** जोगेश्वरी पूर्व येथील अस्मिता सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थेचे रोपटे दिनांक १ मे १९७६ रोजी जोगेश्वरी पूर्व येथे लावले गेले. हे वर्ष म्हणजेच २०२५-२६ साली संस्था सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून मोठ्या उत्साहात साजरे करणार असून याची सुरुवात दिनांक १ मे २०२५ रोजी प्रमुख पाहुणे वक्ते विवेक अग्रवाल यांच्या शुभहस्ते बौद्धिक म्हणून सार्थ, संपन्न, स्वावलंबी राष्ट्र निर्मितीची कुटुंब जीवन ही आधारशीलता आहे असे सांगून समाज जीवनात, समाज निर्मितीत आणि समाज रचनेते कुटुंब संस्थेचे काम अतिशय महत्वाचे आहे असे सूतोवाच केलं. कार्यक्रमाची सुरुवात द्वीप प्रज्वलन करून संस्थेचे विद्यमान अध्यक्ष शेखर पारखी, सरचिटणीस राजन चाचड, विवेक अग्रवाल, रवी नथानी यांच्या शुभहस्ते करण्यात आली.यावेळी माजी मुख्याध्यापक दिलीप माने आणि जॉय ऑफ गिविंग चे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.समाजासाठी माझे काय योगदान असू शकते तसेच काय काय चांगले काम करता येईल यावर उपस्थितांपैकी अनेकांनी प्रतिक्रिया मांडल्या. संस्थे तर्फे चालवण्यात येणाऱ्या अस्थिव्यंग्य चिकित्सा व पुनर्वसन केंद्र, कौन्सिलिंग सेन्टर, कौशल्य विकास केंद्र, शिशू विकास केंद्र, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय इत्यादी विभागाच्या वर्षभराच्या कार्याचा आढावा उपस्थिता सम




रे मांडण्यात आला.संस्थेच्या स्थापने पासून मोलाचे योगदान देणाऱ्या सर्वश्री दादा घैसास, विष्णू गणेश पटवर्धन उर्फ दादा पटवर्धन, डॉ नाथानी, रमेश चिकोर्डे, जगदीश सामंत व नाना बारसोडे या तपस्वी कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

सुवर्ण वर्षात अस्मिता संस्था समाज उपयोगी विविध उपक्रम नव्याने साजरे करणार आहे. अस्मिता एक नावाजलेली संस्था म्हणून मुंबई महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.संस्कृतिक क्षेत्रातही संस्थेने मोलाचे कार्य केले आहे. मराठी नाट्यम होत्सव, विविध सामाजिक विषयावरील व्याख्यान्माला, महाराष्ट्राव्यापी काव्यस्पर्धा व विविध साहित्य विषयक उपक्रम, युवकांसाठी उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा, रक्तदान शिबीर इ अनेक कार्यक्रम अस्मिता संस्था सातत्याने करीत असते. गेल्या पन्नास वर्षात अस्मिता संस्थेला अनेक पुरस्कार मि ळालेले असून अस्मिता संस्थे मधून अनेक दिव्यांग स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत, तसेच अस्मिता संचालीत विद्यालयातून शिकलेले अनेक विधार्थी देशात आणि परदेशात विविध मोठ्या पदांवर काम करीत आहेत याचा सर्वांना अभिमान आहे.सुवर्ण म होत्सवाचे सर्वांनीच स्वागत केलं असून शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांनी 'सस्ती अदालत' उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन

## तालुकास्तरावर सस्ती अदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** विभागीय आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश तक्रारी या शेतरस्ते, पाणंद रस्ते यावरील अतिक्रम णाबाबत असल्याचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार विभागातील सर्व संबंधित नागरिकांना विभागीय आयुक्त यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी वेबिनारद्वारे संवाद साधला. त्यामध्ये म ोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग व शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करुन देण्याची मागणी केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी, मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रस्त्यांची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणेबाबत निर्देशाच्या अनुषंगाने विभागात शेतरस्ते/पाणंद रस्ते अतिक्रम णाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्या निर्दे



शानुसार विभागस्तरावर व जिल्हास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड करून जलद गतीने प्रकरणाचा निपटारा करता सामान्य जनतेस न्याय मि ळावा यासाठी वेळावेळी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येते.

त्याच धर्तीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते/पाणंद रस्ते मोकळे करुन लवकर न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा, यासाठी प्रत्येक म हिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालत आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार, दि. ९ मे, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत या कालावधीत सस्ती अदालतीचे कामकाज सुरु राहणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालूक्यात सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजु शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह तालुक्याचे तहसिलदार यांच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ जास्तीत-जास्त सामान्य, गरजु शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश म हाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### भक्ती बबनराव लोणीकरची ऐतिहासिक कामगिरी: इंडिया डिझाइन वीक २०२५ साठी भक्ती लोणीकर च्या डिझाइन ची निवड

# इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूटो मरांगोनी मध्ये भक्ती लोणीकरने पटकावला प्रथम क्रमांक

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांची सुपुत्री भक्ती बबनराव लोणीकर यांनी इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूटो मरांगोनी मध्ये प्रथम क्रमांक मिळवून आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कठोर परिश्रम आणि अनोख्या डिझाइन दृष्टिकोनाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. याशिवाय, भक्ती यांनी डिझाइन केलेले एक खास उत्पादन भारतातील सर्वात मोठ्या डिझाइन इव्हेंटपैकी एक असलेल्या *इंडिया डिझाइन वीक २०२५* साठी निवडले गेले आहे. या दुहेरी यशामुळे भक्ती बबनराव लोणीकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या कामगिरीने महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे. इंडिया डिझाइन वीक हे भारतातील नवोदित आणि अनुभवी डिझायनर्ससाठी एक अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ आहे, जिथे नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील उत्पादने जगासमोर सादर केली जातात. भक्ती बबनराव लोणीकर हिच्या डिझाइनची या प्रतिष्ठित सोहळ्यासाठी निवड होणे, हे तिच्या सर्जनशीलता आणि डिझाइनम धील अप्रतिम कौशल्याचा पुरावा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण घेऊन भारतात आपल्या



डिझाइनची ओळख करून देणे, ही भक्ती बबनराव लोणीकर हिची मोठी उपलब्धी आहे. 'डिझाइन वीक २०२५' मध्ये तिच्या उत्पादनाला कसा प्रतिसाद मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भक्तीच्या या यशस्वी वाटचालीसाठी आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी जालना जिल्ह्यातील हजारो नागरिक शुभेच्छा देत आहेत.

इन्स्टिट्यूटो म रांगोनी हे इटलीतील मिलान शहरात स्थापित, फॅशन, डिझाइन आणि कला क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त शिक्षण संस्था आहे. १९३५ मध्ये ज्युलिओ मरांगोनी यांनी स्थापन केलेली ही संस्था आज फॅशन आणि डिझाइन शिक्षणातील अग्रगण्य नावांपैकी एक आहे. या संस्थेची शाखा मिलान, फ्लॉरेन्स, पॅरिस, लंडन, दुबई, मुंबई आणि शांघाय यासह अनेक जागतिक शहरांमध्ये आहेत. इन्स्टिट्यूटो मरांगोनी फॅशन डिझाइन, फॅशन बिझनेस, फॅशन स्टायलिंग, इंटिरिअर डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन, व्हिज्युअल डिझाइन आणि कला यासारख्या विविध क्षेत्रांम ध्ये अभ्यासक्रम ऑफर करते. यामध्ये डिप्लोमा, बॅचलर, मास्टर आणि शॉर्ट-टर्म कोर्सेस यांचा समावेश आहे. अभ्यासक्रम हे उद्योगाच्या गरजा आणि नवीनतम ट्रेंड यांना अनुसरून डिझाइन केलेले असतात. दरवर्षी आयोजित होणाऱ्या फॅशन शो आणि प्रदर्शनांमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे काम जागतिक व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळते. इन्स्टिट्यूटो मरांगोनीने जगभरातील अनेक यशस्वी डिझायनर्स आणि फॅशन व्यावसायिक तयार केले आहेत. भक्ती बबनराव लोणीकर यांनी या संस्थेत प्रथम क्रमांक मिळवून आणि 'इंडिया डिझाइन वीक २०२५' साठी निवड होऊन या संस्थेची प्रतिष्ठा आणखी उंचावली आहे. मिलानमधील कॅम्पस अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये डिझाइन स्टुडिओ, लायब्ररी, आणि तंत्रज्ञान-आधारित लॅब्स यांचा सम ावेश आहे. तेथील वातावरण सर्जनशीलता आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देते, जे विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्षात आणण्यास मदत करते. इन्स्टिट्यूटो म रांगोनीची मुंबई येथे शाखा आहे, जी भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण स्थानिक पातळीवर घेण्याची संधी देते. भक्ती लोणीकर यांसारख्या भारतीय विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवून भारतातील डिझाइन क्षेत्राला नवीन उंचीवर नेले आहे. भक्तीच्या डिझाइनची 'इंडिया डिझाइन वीक २०२५' साठी निवड होणे हे तिच्या शिक्षणाचा आणि इन्स्टिट्यूटो मरांगोनीच्या प्रशिक्षणाचा परिणाम आहे. हा इव्हेंट भारतातील डिझाइन क्षेत्रातील नवोदित आणि अनुभवी प्रतिभांना एकत्र आणतो, आणि भक्ती बबनराव लोणीकर या विद्यार्थिनीच्या यशाने या संस्थेच्या शिक्षण पद्धतीची गुणवत्ता अधोरेखित होते.




# ‘ऑपरेशन सिंदूर’नंतर भाजपा जालनाच्या वतीने जल्लोष



**जालना । प्रतिनिधी -** जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २२ एप्रिल रोजी हल्ला केला होता. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अनेक पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. या भीषण हल्ल्यामुळे जम्मू काश्मीरसह संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे. या हल्ल्यात महाराष्ट्रातील काही पर्यटकांचा मृत्यू झाला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या बदला म्हणून पाकिस्तान विरोधात 'ऑपरेशन सिंदूर' लॉन्च करून भारताने पाकिस्तान मधील दहशतवाद्यांच्या खात्मा केल्यामुळे भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना च्या वतीने (ता.०८) फटाके फोडून व पेढे, लाडू वाटून जल्लोष साजर करण्यात आला.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, सौ.विमलताई आगलावे,राजेश राऊत, अशोक आण्णा पांगारकर, सोपान पेंढारकर, सौ.संध्याताई देठे, चंपालाल भैय्या भगत, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, धनराज काबलिये, राजेंद्र भोसले, सुनील भैया खरे, शिवराज जाधव, अमोल कारंजेकर, अमोल धानुरे, बाबासाहेब कोलते, रवींद्र अग्रवाल, जगदीश येनगुपटला, वसंतराव शिंदे, सोमनाथ गायकवाड, आनंद झारखंडे, डोंगरसिंग साबळे, इम्रान सय्यद, सुहास मुंडे, योगेश लहाने, निवृत्ती लंके, सुदर्शन काळे, शिवाजी महाराज गवारे, सुखदेव महाराज गोरे, हरिभाऊ गोरे, नेमिनाथ बागल, विकास कदम, उमेश पेंढारकर, दत्ताभाऊ गारखेडे, भगवानराव शिंदे, संजय माधवले, गौरव गोधेकर, शाम उगले, नितीन कायंदे, तुकाराम बखळे, पवन मुंडे, राहुल जाधव, ओम कळकुंबे, महेश मुळे, अनिल यशवंते, ऋषीकेश खटके, रोहित नलावडे, दौलत भुतेकर, भगवान शिंदे, वेंकटेश गंडाळ, माणिक फड, दीपक सोनुने आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सुनील गोयल यांना रोटरीचा ‘एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी’ जागतिक पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे प्रसिद्ध उद्योजक आणि समाजसेवक सुनील गोयल यांना २०२४-२०२५ या वर्षासाठी रोटरी इंटरनॅशनलतर्फे ‘एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी’ हा अतिशय मानाचा आणि जागतिक दर्जाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. रोटरीचे सदस्य नसलेल्या जगभरातील फक्त १५० व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर झाला असून, त्यात सुनील गोयल यांचाही समावेश आहे. जालना जिल्ह्यासाठी ही एक अत्यंत गौरवाची आणि अभिमानाची बाब ठरली आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती रोटरी इंटरनॅशनलच्या अधिकृत ईमेलद्वारे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांना कळविण्यात आली. त्यानंतर रोटरीच्या प्रांतीय बैठकीत सुनील गोयल यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच याप्रसंगी रोटरीच्या सर्विस अबाउ सेल्फ या जागतिक पुरस्काराचे मानकरी अरुण अग्रवाल यांचाही सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, मुंबईचे माजी प्रांतपाल चंद्रशेखर नौलवेकर, माजी प्रांतपाल जुबिन अमेरिया, डॉ. राजीव प्रधान, हरीश मोटवानी, सन २०२५- २६ चे प्रांतपाल सुधीर लातूरे, सन २०२६-२७ चे प्रांतपाल जयेश पटेल, सौ. निर्मला साबू, सौ. सपना गोयल, उपप्रांतपाल किशोर देशपांडे यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना डॉ. सुरेश साबू म्हणाले की, सुनील गोयल यांच्या मानवसेवा व समाजसेवेच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली, याचा आम्हाला अभिमान वाटतो. रोटरीचे सदस्य नसतानाही त्यांचे योगदान इतके प्रभावशाली आहे की, त्यांना जगातील फक्त १५० निवडक व्यक्तींम ध्ये स्थान मिळाले. माझ्या कार्यकाळात याआधी ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल यांनादेखील सर्विस अबाऊ सेल्फ हा जागतिक पुरस्कार मिळाला होता आणि आता सुनील गोयल यांनादेखील पुरस्कार जाहीर झाल्याने जालन्यातील प्रांतपाल पदाच्या कार्यकाळात हे दुसरे जागतिक गौरवाचे यश मि ळाले, हा संपूर्ण जालन्यासाठी मोठा सन्मान आहे. हा सन्मान म्हणजे केवळ एका व्यक्तीचा गौरव नाही, तर त्यांच्या माध्यमातून संपूर्ण प्रांतातील सामाजिक कार्य आणि मूल्याधिष्ठित उपक्रम ांची आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली ठसठशीत नोंद आहे. रोटरी इंटरनॅशनलतर्फे देण्यात येणारा ‘एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी’ पुरस्कार हा मानवतेसाठी केलेल्या अपूर्व योगदानाची दखल घेणाऱ्या सर्वोच्च पुरस्कारांपैकी एक मानला जातो व सर्वांकरता ही बाब प्रेरणा देणारी आहे, असे ते म्हणाले.




यावेळी रोटरी प्रांत ३१३२ च्या ११ जिल्ह्यातून सर्व प्रतिनिधी, रोटरी सदस्य, तथा माजी व नियोजित प्रांतपालांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन प्रांतीय मुख्य सचिव डॉ. नितीन खंडेलवाल यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रांत सचिव डॉ. सौ. सुमित्रा गादिया यांनी मानले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.